# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक १५/०८/२०१९

## शहीद पोलीस कर्मचाऱ्यांच्या माता व पत्नींनी बांधल्या जवानांना राख्या

- **एस.एन.डी.टी. विद्यापिठातील विद्यार्थीनिंनी जवानांसाठी पाठविल्या ६५०० राख्या**

एस.एन.डी.टी महिला विद्यापीट चर्चगेट मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. शशीकला वंजारी, कुलसचिव डॉ. दिपक देशपांडे यांचे मार्गदर्शनाखाली समाजकार्य आणि आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे प्रमुख डॉ. आशा पाटील यांचे नेतृत्वात **कृतज्ञता** या नावाने सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रमाअंतर्गत श्री. अमेय महाजन, अक्षीत बक्षी, पुनम गायकवाड, श्रीमती मुनीरा मॅडम यांचे सहयोगातुन एस.एन.डी.टी. विद्यापीठातील विद्यार्थीनींनकडून देशाची अंतर्गत सुरक्षा सांभाळणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गडचिरोली जिल्हयात आदिवासींच्या संरक्षणासाठी व लोकशाही टिकविण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या जवानांप्रती आदर भावनेतुन ६५०० राखी पाठविल्या होत्या.

त्या अनुषंगाने गडचिरोली पोलीस दलातर्फे रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात शहीद पोलीस कर्मचाऱ्यांच्या माता व पत्नीसह शालेय विद्यार्थीनींनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना राखी बांधुन रक्षा बंधनाचा सण उत्साहात साजरा केला.

या प्रसंगी मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा., अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. मोहित कुमार गर्ग सा., अपर पोलीस अधिक्षक (अभियान) गडचिरोली श्री. अजय कुमार बन्सल सा. यांचे सह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी उपस्थित महिलांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.




ABVP